नि .दि.दावा क्र. ५१/२०२३
संजयकुमार वि. विरेंद्र
निशाणी क्र. १६८

वादीतर्फे साक्षीदार क्र. ३ शिवकुमार झाडे ,
मी शपथेवर सांगतो की,

<u>सरतपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. हरिणखेडे यांच्यातर्फे शपथेवर सुरु-</u>

माझ्या शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर आहे, त्यावर मी वाचुन सही केली आहे. सरतपास पुर्ण.

<u>उलटतपास प्रतिवादी क्र. १ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. बरघट यांद्वारे -</u>

२. प्रस्तुत प्रकरणात मला साक्ष देण्याकामी वादीने सांगितले. आज रोजी मी स्वतंत्र न्यायालयात आलो आहे. हे म्हणणे खरे आहे की मला शपथपत्र तयार करण्यासाठी वादी घेवुन गेला होता. हे म्हणणे खरे नाही की शपथपत्र हे वादीच्या सांगण्यावरुन बनविण्यात आले. मी वादीच्या ढाब्यावर कधी कधी जेवण करण्यासाठी जात असतो. हे म्हणणे खरे आहे की वादी आणि माझे संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी तिथे शेती करता याचा काही पुरावा नाही.

प्रश्न- वादीचे वडील १९९९ पासुन ढाबा चालविताता याचा काही पुरावा नाही ?

उत्तर- पुरावा ठेवायचा प्रश्नच येत नाही.

३. हे म्हणणे खरे खरे नाही की मी वरील पत्त्यावर राहत असल्याचे आणि सर्वे नं. ५७ चा मालक असल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की वादीचे वडील १९९९ पासुन ढाबा चालवत असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

SARODE SANDEEP MARUTI

A.R. No. 106-2005
Digitally signed by SARODE SANDEEP MARUTI
Location: Ramtek
Date: 2025.01.23 ...:15 +0530

(एस.एम. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
रामटेक

दिनांक २३.०१.२०२५
रामटेक

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are same word to word as per original evidence.

Name of Stenographer : R. J. Khobragade (Gr.-II)